# University of Mumbai

**Second REVISED**

**No. Aff./Recog.I/Admission/ (2017-18 )64/ of 2017**

**C I R C U L A R:-**

The Principals of the affiliated colleges in Arts, Science, Commerce and Co-ordinator, University sub centers (Thane and Ratnagiri) are hereby informed that the procedure for admission in Govt./Private/Aided/ Unaided/Minority colleges affiliated and university sub centers of this University is to be followed strictly in accordance with this office circular No. घ.म./१८८/२००३ दिनांक १३ मे, २००३.

Further, they are informed that considering the Date of declaration of the Result for the H.S.C. Examination (12$^{th}$ Std) i.e. on **30/05/2017**, the Admission process of F.Y.B.A, F.Y.B.Sc & F.Y.B.Com including F.Y.B.M.M., F.Y.B.S.W., F.Y.B.A In FT & NMP, F.Y.B.A.(In French Study), F.Y.B.A ( In German Study), F.Y.Bachelor of Culinary Art, F.Y.B.A.M.A. (Integrated course in German studies), F.Y.B.M.S., F.Y.B.M.S-M.BA (5 Years Integrated course), F.Y.B.Com (Financial Market), F.Y.B.Com (Accounting & Finance), F.Y.B.Com (Banking & Issuance), F.Y.B.Com (Financial Management), F.Y.B.Com (Investment Management), F.Y.B.Com (Transport Management), F.Y.B.Com/B.M.S. (E.M.E.), F.Y.B.Sc (Information Technology), F.Y.B.Sc (Computer Science), F.Y.B.Sc (Hospitality Studies), F.Y.B.Sc (Microbiology), F.Y.B.Sc (Bio-Chemistry), F.Y.B.Sc (Bio-Technology), F.Y.B.Sc (Maritime H.S), F.Y.B.Sc (Nautical Science), F.Y.B.Sc (Forensic Science), F.Y.B.Sc (Home Science), F.Y.B.Sc (Aeronautics – Avionics and Mechanical), F.Y.B.Sc (Aviation) F.Y.B.Sc (Human Science), F.Y.M.Sc. Bio-Analytical Science (5 Years Integrated course), F.Y.B.Voc (T & H.M), F.Y.B.Voc (R.M), F.Y.B.Voc (F.M.& S), F.Y.B.Voc (R.E.M), F.Y.B.Voc (M.P), F.Y.B.Voc (M.L.T), F.Y.B.Voc (Green House Management), F.Y.B.Voc (Pharma Analytical Science), F.Y.B.Voc (Tourism and Travel Management), F.Y.B.Voc (Software Development), F.Y.B.Library Science courses for the Academic year 2017-18 is as follows.

| | | |
|---|---|---|
| **Sale of Forms** | : | Will be Continue till final cut of date of Admission. |
| **Open Online link and Submission of Pre Admission Online Enrolment forms**<br>**Submission of Admission form Alongwith printed copy of Pre-Admission Enrolment forms (Mandatory)** | : | Wednesday, the 21$^{st}$ June, 2017. (5.00 p.m.) (on working days)<br>[Further It will be Continue from 4$^{th}$ July, 2017 for left over seats, If any.] |
| **First Merit List** | : | Thursday the **22$^{nd}$ June, 2017** (5.00 p.m.) |
| **Verification of Documents and payment of fees** | : | Friday, the **23$^{th}$ June, 2017,**<br>Tuesday, the **27$^{th}$ June, 2017** and Wednesday, the **28$^{th}$ June, 2017** (up to 4.30 pm) (on working days) |
| **Second Merit List** | : | Wednesday, the **28$^{th}$ June 2017** (5.00 p.m.) |
| **Verification of Documents and payment of fees** | : | Thursday, the **29$^{th}$ June, 2017,**<br>Friday, the **30$^{th}$ June, 2017** and Saturday, the **01$^{st}$ July, 2017** (up to 4.30 pm) (on working days) |
| **Third & Final Merit List** | : | Saturday, the **01$^{st}$ July, 2017** (5.00 p.m.) |
| **Verification of Documents and payment of fees** | : | Monday, the **03$^{th}$ July, 2017,**<br>Tuesday, the **04 July, 2017** and Wednesday, the **05$^{th}$ July, 2017** (up to 5.00 pm) (on working days) |

Note:- Link for online application of pre-admission online Enrolment forms will be available from **01$^{st}$ June, 2017** on website:- ***mum.digitaluniversity.ac***

The Principals of the Affiliated college and Co-ordinator sub centers Thane and Ratnagiri are hereby directed to strictly adhere to the schedule of admission.

14/6/17

Mumbai-400 032
16$^{th}$ June, 2017

(Dr. M. A. KHAN)
REGISTRAR

# University of Mumbai

## No. Aff./Recog.I/Admision/ (2017-18) / 34 / of 2017

**C I R C U L A R:-**

The Principal of the affiliated colleges in Arts, Science, Commerce and Co-ordinator university sub center are hereby informed to follow the procedure of admission scrupulously.

**1. The reservation for different reserved categories are as under % allocation seats:-**

| | | |
|---|---|---|
| i) | 13% Seats | : S.C. |
| ii) | 7% Seats | : S.T. |
| iii) | 3% Seats | : D.T. (A) |
| iv) | 2.5% Seats | : N.T. (B) |
| v) | 3.5% Seats | : N.T. (C) |
| vi) | 2% Seats | : N.T. (D) |
| vii) | 19% Seats | : O.B.C. |
| viii) | A) Women | : As per circular No. aff/Recog./322 of 2000 dated 7th September, 2000 |
| | B) S.B.C. | : 2% As per circular No. BCC/29/334 of 1997 dated 25th September, 1997 |
| | C) Physically Handicapped | : As per circular No. Special Cell/2/2008 dated 25th January, 2008 |
| ix) | 3% Seats | : खालील संवर्गातील (परिपत्रक कमांक मान्यता/ संलंग्नता/निर्देश/२२१ दिनसंक ६.६.१९९८ प्रमाणे) |

१. बदलून आलेले केंद्रिय/ राज्य शासकिय कर्मचारी/ अधिकारी यांचे पाल्य

२. संरक्षण दलातील आजी/ माजी सैनिकांचे पाल्य

३. राष्ट्रीय /राज्य पातळीवर किडा व संस्कृतिक कार्यकमात विशेश नैपुण्य मिळवलेले विद्यार्थी

४. विधवा/ परित्यक्ता विद्यार्थिनी

५. स्वातंत्र सैनिकाचे पाल्य/ नातवंडे

x. Two supernumerary seats for students from Jammu & Kashmir as per University Circular No. Aff/ICC/2012-13/22 dated 8th January, 2013

**2. The Quota:-**

**Minority and Non-Minority Colleges**

As per University Circular No. Spl.Cell/(68)/218/2005 dated 3rd June, 2005

1. In house Students be admitted first as per practice followed in the preceding years for admission to F.Y.B.A./ B.Sc./B. Com. Classes only.

2. Fees:- Strictly as prescbied by the University . Further fees be charged from Reserved category students as per circular no वि.क./भासशि(२४)/३६०/२००४ दिनांक २५ ऑगस्ट, २००४ and circular no वि.क./भासशि/पदवि/२/२०१३ दिनांक ७ जून, २०१३
3. No. Colleges shall conduct its own CET test for admission to any course of University unless it is an autonomous college.

Further, they are requested to form the Admission cell/ Committee Comprising of Senior Teaching Staff inclusive of representative of Reserved Category for smooth conduct of the admission process. **The vacant representative seats should be indicated on notice board** and to be converted as per the prescribed procedure.

They are further informed that the communication regarding Centralized Admission Co-ordination Cell for admission to the Students deprived/ unable to seek admission at the F.Y.B.A, F.Y.B.Sc & F.Y.B.Com etc. classes during the academic year 2017-18, will be issued separately.

Merit list of reserved category should be displayed separately and category wise as per admission schedule.

(Dr. M. A. KHAN)
REGISTRAR

Mumbai-400 032
16th June, 2017

To,

The Principals of the all affiliated colleges in Arts, Science, Commerce, Management and Co-ordinator University sub centers for information and necessary action.

********

Copy forwarded for information to:-

1. The Deputy Registrar, Enrollment Section
2. The Deputy Registrar, (Public Relation)
3. The Deputy Registrar, Special Cell
4. The Co-ordinator, U.C.C., Vidyanagari
5. E.S. to Vice Chancellor
6. P.A. to Pro-Vice Chancellor
7. P.A. to Director, (A&P).
8. P.A. to Registrar
9. P.A. to Director of Examination & Evaluation
10. P.A. to F & A.O.
11. P.A. to Director, IDOL
12. Receptionist/ Telephone Operators (Fort/Vidyanagari/Campus)

# UNIVERSITY OF MUMBAI

Aff./Recog./ 322 of 2000

## CIRCULAR

The Directors/Heads of the University Departments, Principals of the Affiliated Colleges and Heads of the recognized Institutions are hereby informed that the Management Council at its meeting held on 3rd August, 2000 vide item No.6 considered the Government Resolution No.GEC-1000/(123/2000) Tanshi-1, Dated 17th April, 2000, received from the Under Secretary, Government of Maharashtra, Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai (copy enclosed) and resolved as under :

"असा ठराव करण्यात आला की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशाकरीता महिलांसाठी ३०% आरक्षण ठेवण्याबाबत महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी क्रमांक जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१, दिनांक १७ एप्रिल, २००० अन्वये निर्गमित केलेला शासन निर्णय स्वीकारण्यात यावा."

They are therefore requested to take necessary action as per the above mentioned resolution.

MUMBAI : 400 032
7th SEPTEMBER, 2000

for REGISTRAR

To,

The Directors/Heads of the University Departments, Principals of Affiliated Colleges and Heads of recognized Institutions.

No.Aff./Recog./ 322-A of 2000. 7th September, 2000.

A) Copy to :-

1) The Director, Board of College and University Development.
2) The Director, Institute of Distance Education.
3) The Librarian, University Library.
4) The Presiding Officer, College Tribunal.
5) The Controller of Examinations.

...2/-

B) Copy to :-

1) The Assistant Director and the Project Officer,
Department of Adult & Continuing Education and Extension,
2) The Project Officer, Garware Institute of Career
Education and Development,

C) Copy to :-

1) The Deputy Registrars of University of Mumbai.
2) The Secretary, Board of Students' Welfare,
3) The Personal Assistants to (i) the Vice-Chancellor
(ii) the Pro-Vice-Chancellor and (iii) the Registrar.

(Record Section 10 copies)

for REGISTRAR

महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. जीईसी-१०००/(१२३/२०००)/तांशि-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक: १७ एप्रिल, २०००

प्रस्तावना:-
----------

भारताच्या संविधानात स्त्री-पुरुष भेद न ठेवता समानतेचे तत्व हा नागरीकांचा मूलभूत हक्क मानण्यात आला आहे. तसेच महिलांच्या बाबतीतही घटनेत सकारात्मक धोरण स्विकारण्यात आले आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने संधी देणे अपेक्षित असले तरी विविध शिक्षण अभ्यासक्रमाकरिता स्त्रियांना समान संधी प्रत्यक्षात मिळत नाही. स्त्रियांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी त्यादृष्टीने ठरा प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिलांचे बलशालीकरण आणि समाजाच्या सर्व क्षेत्रामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग करून सर्वांगीण मानवी विकासाच्या विविध क्षेत्रामध्ये सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी महिलांच्या शिक्षणाकडे जाणिवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन शासन निर्णय दि. २२. ६. १९९४ अन्वये शासनाने महिलांना शासकीय नोकरीमध्ये ३० टक्के जागा आरक्षित ठेवल्या आहेत. यामागील खरा हेतू साध्य होण्याकरिता आता महिलांना पदवी अभ्यासक्रमाकरिता ३० टक्के आरक्षण ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्याबाबत शासनाचा विचार होता.

शासन निर्णय:-
------------

वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्यातील सर्व पारंपारिक विद्यापीठे व त्यांना संलग्नित असलेल्या सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात येत आहे.

सदरचे आरक्षण बिनराखीव व राखीव या दोन्ही प्रवर्गासाठी लागू राहील. जर बिनराखीव जागा १०० असतील तर त्यापैकी ३० जागा महिलांकरिता आरक्षित राहतील.

तसेच सदरचे आरक्षण हे सध्या विविध सामाजिक प्रवर्गाकरिता विहित केलेल्या संविधानात्मक राखीव जागा अंतर्गत समांतर आरक्षण (Horizontal) रहीले, उदाहरणार्थ जसे की, सध्या संविधानातील तरतुदीनुसार शासनाने अनुसूचित जातींच्या ∠प्रवर्गाकरिता १३ टक्के जागा आरक्षित आहेत. त्यापैकी त्यातील ३० टक्के आरक्षण हे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिताच ठेवण्यात येईल व जर या

∠प्रवर्गातील विद्यार्थी

(कृ. मा. प.)

किमान

प्रवर्गातील किमान पात्रता असलेल्या महिला उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पुरुष वर्गातून भरण्यात येतील. म्हणजेच जर प्रवेशाकरिता एखाद्या विद्याशाखेसाठी प्रथम वर्षासाठी १०० जागा असतील तर त्यापैकी १३ जागा अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता सध्या असलेले आरक्षण विचारात घेऊन त्यापैकी ३० टक्के म्हणजेच ४ जागा ह्या अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील महिला उमेदवारांकरिता आरक्षित राहतील.

वर उल्लेखिलेल्या पध्दतीनेच इतर सर्व प्रवर्गांकरिताही सध्या असलेल्या आरक्षणांतर्गत महिलांना ३० टक्के समांतरपणे आरक्षण ठेवण्यात येईल. तसेच ज्या पदवी अभ्यासक्रमांकरिता मूल्यभारीत व मुक्त जागांवर देण्यात येतात ह्या प्रवेशा अंतर्गत देखील ३० टक्के आरक्षण महिलांकरिता देण्यात येईल.

सध्या सर्व तंत्र निकेतनांमध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी महिलांकरिता शासन निर्णय क्र. डब्ल्युबीपी-१०९५/(२७१९)/व्यशि-५, दि. १७.१.१९९६ अन्वये ठेवलेल्या २५ टक्के आरक्षणात वाढ करुन आता ते ३० टक्के इतके करण्यात येत आहे.

सदरच्या आरक्षित जागांवर जर महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर या रिक्त जागा त्याच शैक्षणिक वर्षात पुरुष संवर्गातून भरण्यात येतील व या रिक्त जागांचा त्या पुढील शैक्षणिक वर्षात अनुशेष धरला जाणार नाही.

वैद्यकीय शिक्षण विभाग आणि कृषि व पदुम विभागांतर्गत येणा-या सर्व पदवी अभ्यासक्रमांकरिता आदेश संबंधित विभागांकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

सदरचे आरक्षणविषयक आदेश शैक्षणिक वर्ष सन २०००-२००१ पासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही

(प्र. ह. क्षीरसागर)
शासनाचे सहसचिव

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, उद्योगधंदे-संस्था-समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विद्यापीठांचे कुलगुरु व कुलसचिव
सर्व सहसंचालक तंत्र शिक्षण / उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये.
प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र महाविद्यालये, तंत्र निकेतने व संस्था (तंत्र शिक्षण संचालकामार्फत)
प्राचार्य, सर्व वरिष्ठ महाविद्यालये (उच्च शिक्षण संचालकामार्फत)
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक,

## मुंबई विद्यापीठ

क्रमांक संलग्नता / मान्यता / निदेश / २११ १९९८

संदर्भ :

१. विद्यापीठ परीपत्रक क्रमांक घ म / व्ही सी डी / २६८ दिनाक १५ जून, १९९६
२. विद्यापीठ परीपत्रक क्रमांक घ म / प्रवेश कक्ष / २१३ दिनाक १५ जून, १९९७
३. विद्यापीठ परीपत्रक क्रमांक घ म / प्रवेश कक्ष / २२३ दिनाक २३ जून, १९९७

ज्याअर्थी, विद्यापीठाने परिपत्रक क्रमांक घ म/प्रवेश कक्ष/२१३/१९९७ अन्वये कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांच्या संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांच्या प्रवेशाबाबत निदेश देण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, वर नमूद केलेल्या परिपत्रकाद्धारे एकूण प्रवेशाच्या ३% जागा ह्या खालील संवर्गासाठी राखीव ठेवण्यासाठी रिक्त ठेवण्याबाबत निदेश देण्यात आले होते :-

१. बदलून आलेले केंद्रीय/राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांचे पाल्य
२. संरक्षण दलातील आजी/माजी सैनिकांचे पाल्य
३. राष्ट्रीय/राज्य पातळीवर क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांस विशेष नैपुण्य मिळविलेले विद्यार्थी
४. शारीरिकदृष्ट्या अपंग/विकलांग विद्यार्थी
५. विधवा/परित्यक्ता विद्यार्थिनी
६. स्वातंत्र्यसैनिकांचे पाल्य/नातवंडे

आणि ज्याअर्थी, ह्या जागा राखून ठेवण्यासाठी शासनातर्फे मा उच्च न्यायालयात विनंती अर्ज करण्यात आला होता.

आणि ज्याअर्थी, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री एम.बी.शाह व श्रीमती आर.पी.देसाई यांच्या खंडपीठाने याचिका क्रमांक ४६५ / ९७ च्या संदर्भात दि.१७ जून, १९९७ रोजी अंतरिम आदेश देण्यात आले होते.

आणि त्याअर्थी, मी. डॉ (श्रीमती) स्नेहलता शा. देशमुख, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम १४(८) अन्वये, कला, वाणिज्य

व विज्ञान शाखांतील संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री. एम.बी.शाह व श्रीमती आर.पी.देसाई यांच्या खंडपीठाने याचिका क्रमांक ४६५/९७ च्या संदर्भात दिनांक १७ जून, १९९७ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार असे निदेश देते की, त्यांनी वर नमूद केलेल्या ३% जागा संबंधित संवर्गातून भरण्याची प्रक्रिया करावी.

मुंबई : ४०० ०३२.
६ जून, १९९८

सही/-
(डॉ.स्नेहलता शा. देशमुख)
कुलगुरू

प्रति,

प्राचार्य सर्व संलग्न शासकीय व अशासकीय कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

# University of Mumbai

No.Aff/ICC/2012-13/22 of 2013

**CIRCULAR:**

All the Principals/Directors of the affiliated colleges/recognized institutions, the Directors/Heads of the University Departments/Institutions and all the Deputy Registrars of the Registrar's Office of the University of Mumbai are hereby informed that vide D.O. letter No.F.1-1/2012(SA-III) dated 1st October, 2012 of Prof. Ved Prakash, Vice-Chairman & Chairman (Actg.), University Grants Commission, New Delhi addressed to Hon'ble Vice-Chancellor informed about provision of two supernumerary seats for students from J & K in the Universities and colleges which are recognized under Section 2(f) and 12 (B) of the University Grants Commission Act for general courses (copy enclosed).

They are, therefore, requested by the direction of the Hon'ble Vice-Chancellor to take all the necessary steps for provision of two supernumerary seats for students from J & K in their respective Department/Institution/College for general courses.

MUMBAI – 400 032
8th January, 2013

[ KUMAR KHAIRE ]
REGISTRAR

To

All the Principals/Directors of the affiliated colleges/recognized institutions, the Directors/Heads of the University Departments/Institutions and all the Deputy Registrars of the Registrar's Office.

******

Copy forwarded for information to:

1. The Director, Department of Students' Welfare
2. The Assistant Registrar, Enrolment/Eligibility Section
3. Record Section, University of Mumbai
4. E.S. to Vice-Chancellor
5. P.A. to Pro Vice-Chancellor
6. P.A. to Registrar
7. P.A. to Director, B.C.U.D.

IS/ECD/2012-13/27756

...ाय अनुदान आयोग
... जफर मार्ग, नई दिल्ली-110 002
...RSITY GRANTS COMMISSION
...ADUR SHAH ZAFAR MARG,
...W DELHI-110 002
...FF. : (011) 23234019
: (011) 23236350
FAX : (011) 23239659
E-mail : cm@ugc.ac.in

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

(2)

प्रो॰ वेद प्रकाश
उपाध्यक्ष

Prof. Ved Prakash
Vice-Chairman
&
Chairman (Actg.)

D.O. No. F.1-1/2012 (SA-III)

October 1, 2012

Att/8568
19/10/12

Dear Vice-Chancellor,

As you are aware, based on the recommendations of the Expert Group, the Department of Higher Education, Ministry of Human Resource Development, is implementing a Special Scholarship Scheme for Students from Jammu & Kashmir (J&K). The main objective of this scheme is to encourage students from J&K to pursue higher studies in institutions of higher learning located outside the State of J&K. We have been told that during the Inter-Ministerial Committee meeting held on 23rd August, 2012, it has been decided that these students may be accommodated by creating two seats under supernumerary quota across the institutions. Under this scheme, students from J&K, who secure admission in a recognized institution of higher learning, will be provided scholarship to cover tuition fees, hostel fees, cost of books and other incidental charges.

In view of the above, the aforesaid matter was taken up by the University Grants Commission in its meeting held on 6th September, 2012. After due deliberations, the Commission has accorded its approval for the provision of two seats under supernumerary quota in the universities and colleges and thus approved creation of two supernumerary seats in all institutions, which are recognized under Section 2(f) and 12 B of the UGC Act, for general courses.

In view of the above, you are requested to kindly take all necessary steps for provision of two supernumerary seats for students from J&K in your esteemed institution. May I also request you to ensure wider circulation of this letter to all the institutions under your jurisdiction besides making a special request to them for ready compliance.

With kind regards,

Yours sincerely,

(Ved Prakash)

The Vice-Chancellor
University of Mumbai
M.G. Road, Fort
Mumbai - 400 032

# मुंबई विद्यापीठ

अत्यंत महत्वाचे
रिपड पोस्टाने/हस्तेबटवडा

क.वि.क./आयसीसी/२०१४-१५/१३

परिपत्रक :-

प्राचार्य/ संचालक संलग्नित अशासकीय (अल्पसंख्यांक) अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व तत्सम महाविद्यालये व संस्था यांना कळविण्यात येते की, शासनाने निर्गमित केलेले अल्पसंख्यांक विभागाचे शासन परिपत्रक क्र अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५ दिनांक १८ जून,२०१४ चा शासन परिपत्रक विद्यापीठाच्या व्यवस्थापना परिषदेने बाब क्र.३२ नुसार स्वीकारण्यात आलेला आहे. (प्रत संलग्न)

तद्‌अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संबंधीत शासन परिपत्रकामध्ये नमुद केल्या प्रमाणे धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांकडुन चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थानी विद्यार्थांना प्रवेश देताना संबंधीत शासन परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दती, अटी व शर्ती नुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक : १९ सप्टेंबर, २०१४
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२

डॉ. एम.ए.खान
कुलसचिव

--------

क.वि.क./ १३ /२०१४

दिनांक : १९ सप्टेंबर, २०१४

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१) प्राचार्य/ संचालक संलग्नित अशासकीय अल्पसंख्यांक अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व तत्सम महाविद्यालये व संस्था.

डॉ. एम.ए.खान
कुलसचिव

महाराष्ट्र राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना अवलंबण्याच्या कार्यपध्दती, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ जून, २०१४

वाचा:- शासन निर्णय क्रमांकः अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांकः अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५ दिनांक २७.०५.२०१३

प्रस्तावना :-

राज्यातील अल्पसंख्यांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थाना धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जा प्रदान करण्याबाबतची कार्यपध्दती, अटी व शर्ती संदर्भाधिन शासन निर्णयान्वये विहित करण्यात आल्या आहेत. राज्यातील अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना प्रदान केलेल्या संबंधित धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थी उपलब्ध होत नसल्याने वारंवार उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या शैक्षणिक संस्थाकडून संदर्भाधिन शासन निर्णयातील कार्यपध्दती, अटी व शर्ती या मध्ये सुधारणा करण्याबाबतची मागणी करण्यात येत होती. याबाबत सर्वकष विचार करुन उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन परिपत्रक :-

प्रवेश भरतीसंबंधी उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय दि. २७.०५.२०१३ च्या भाग "अ" परिच्छेद क्र. १०(iv) येथील (अ) (ब) व (क) मध्ये सुधारणा करण्यात येत असुन हे सुधारीत परिच्छेद खालील प्रमाणे आहेत.

१० (iv) - अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यवसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत :- पदवी / पदविका व पुढील अभ्यासक्रमांसाठी खालील प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी.

I) अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :-अ) सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

(ब) अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागावर त्यांना प्राप्त झालेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेशांमध्ये अग्रक्रम (Priority) देण्यात यावा. जर, संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक ५०% विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत, तर पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- अनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(ii) अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था :- अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यर्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थीदेखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

(iii) तसेच उर्वरित ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

II विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था :- सर्व विना अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. जर,

संबंधित धार्मिक /भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस उपरोक्त प्रमाणे ५१% त्यांच्या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त समुहातील धार्मिक/भाषिक विद्यार्थी उपलब्ध झाले नाही तर, पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.

(i) विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित धार्मिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास अल्पसंख्याक कोटयातील जागांवर भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

ii) विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था:- विनाअनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्थानी राज्य शासनाने घोषित केलेल्या अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व अन्य भाषिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी देखील उपलब्ध न झाल्यास उर्वरित रिक्त अल्पसंख्याक कोटयातील जागांवर धार्मिक अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत व त्यानंतर सर्वंकष प्रयत्न केल्यानंतर सुध्दा काही जागा रिक्त राहिल्यास रिक्त जागी बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शासनाची पूर्वपरवानगी घेऊन प्रवेश देण्यात यावेत.

iii) तसेच उर्वरित ४९% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरतांना संबंधित शैक्षणिक संस्थांनी खुल्या प्रवर्गातील तसेच त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष प्रवर्ग इत्यादींना सामाजिक न्याय व समतोल साधण्याकरिता प्रवेश द्यावेत.

वरील प्रमाणे कार्यवाही करतांना अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना भाग "अ" च्या परिच्छेद १०(iv) (ड) मध्ये नमुद केल्याप्रमाणे वृत्तपत्रात जाहिराती प्रसिध्द करण्यात याव्यात व जाहिरातीमध्ये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस प्राप्त धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणे तसेच राज्य शासनाने घोषित केलेले राज्यातील अन्य धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून, यथास्थिती, अर्ज मागविण्यात यावेत. उपरोक्त जाहिरातीमध्ये संस्थेस प्राप्त अल्पसंख्याक दर्जाचे विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर, त्यानंतर अन्य अल्पसंख्याक धार्मिक/भाषिक समुहातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्यात येतील, असे नमुद करण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०६१८१४५१२४२६१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ainul Chand Attar

Digitally signed by Ainul Chand Attar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MDD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ainul Chand Attar
Date: 2014.06.18 14:53:32 +05'30'

श्रीमती अैनुल अत्तार
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रबंधक, अपिलीय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, खंडपीठ नागपूर
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
१०.प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
११.धर्मादाय आयुक्त, उच्च न्यायालय, मुंबई
१२.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
१६.संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
१७.संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे
१८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१९. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
२१. निवडनस्ती

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासकीय/खाजगी अनुदानित/विना अनुदानित, अल्पसंख्यांक अनुदानित/ अल्पसंख्यांक विना अनुदानित संस्थांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अंमलात आणावयाचे धोरण - - बिगर व्यावसायिक संस्था

## महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : युएसजी २००३/(३३/०३)/२/विशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ एप्रिल, २००३

<u>**प्रस्तावना**</u> : टी. एम. ए. पै फौन्डेशन व इतर विरुध्द कर्नाटक राज्य व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिका क्रमांक : ३१७/१९९३ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ११ न्यायाधिशांच्या खंडपीठापुढे सुनावणी होऊन दिनांक : ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सर्वंकष विचार करुन धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली होती. मंत्रिमंडळ उपसमितीने या संदर्भात वेळोवेळी शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांबरोबर चर्चा करुन त्याचा अहवाल मंत्रिमंडळासमोर दिनांक २१ मार्च २००३ रोजी सादर केला. अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक २४ मार्च, २००३ रोजी झालेल्या बैठकीत याबाबत धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

<u>**शासन निर्णय**</u> शासन या आदेशाद्वारे सर्व <u>बिगर व्यावसायिक</u> शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची पात्रता व प्रक्रिया खालील प्रमाणे ठरवित आहे:-

(अ) शिक्षण शास्त्र अभ्यासक्रम

प्रवेश पात्रता

मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण

प्रवेश प्रक्रिया

१) हे प्रवेश संस्था स्तरावर गुणवत्तेनुसार करण्यात येतील.

२) व्यवस्थापनासाठी १५ टक्के जागा अभ्यासक्रम निहाय ठेवण्यांत येतील (शासकीय संस्था / महाविद्यालये वगळून).

कृ.मा.प./-

प्रवेश प्रक्रिया

१) कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील प्रवेश हे संस्था स्तरावर गुणवत्तेनुसार देण्यात येतील.

(२) हे प्रवेश विद्यापीठ व शासन स्तरावरुन निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे देण्यात येतील.

(३) व्यवस्थापनासाठी १५ टक्के जागा अभ्यासक्रम निहाय ठेवण्यांत येतील ( शासकीय संस्था / महाविद्यालये वगळून ).

(४) उपरोक्त सर्व जागा गुणवत्तेनुसार भरुन प्रवेशातील प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी.

(५) पारदर्शकता व गुणवत्ता याचे पालन करण्याची जबाबदारी संस्थावर राहील. मात्र या संदर्भात कोणत्याही तक्रारी आल्यास त्याची तपासणी करण्याचे अधिकार विद्यापीठ व शासनास राहतील.

(६) कला, विज्ञान, वाणिज्य विद्याशाखांतर्गत विद्यापीठांनी सुरु केलेले नवीन अभ्यासक्रमांचे प्रवेश (उदा. बी.एम.एस., बी.एम.एम., बी.सी.एस., बी.एस्सी (आय.टी.)हे विद्यापीठाने वेळोवेळी ठरविलेल्या पध्दतीने केले जातील.

(ड) कला, विज्ञान ,वाणिज्य , विधी, शिक्षणशास्त्र या विषयाचे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम

प्रवेश पात्रता

संबंधित विषयाच्या प्रवेशाकरीता विद्यापीठांनी ठरवून दिलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक

प्रवेश प्रक्रिया

१) कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षण शास्त्र या विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी प्रवेश हे संस्था स्तरावर / विद्यापीठ विभागावर गुणवत्तेनुसार देण्यात येतील.

..४/-

३. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. संचालक, (व्यवसाय शिक्षण) ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६. संचालक, (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. संचालक, (कला ), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. मा. कुलगुरु, सर्व विद्यापीठे,
९. मा. कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
१२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण,
१३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
१४. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
१५. मा. मंत्र्यांचे /राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
१६. मा.मुख्यसचिव यांचे अवर सचिव,
१७. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१. सचिव , आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२२. सर्व मंत्रालयीन विभाग
२३. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने,
२४. निवड नस्ती विशि-४

D:\Padma\G R\Vishi ४\nonvocc.२doc